MHNB100019442021

| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | - | १२.११.२०२१ |
| नोंदणी दिनांक | - | १२.११.२०२१ |
| निकाल दिनांक | - | ०५.०५.२०२६ |
| कालावधी | - | वर्ष महिने दिवस<br>०४ ०५ २३ |

**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, अक्कलकुवा, ता. अक्कलकुवा, जि. नंदूरबार यांचे न्यायालयात**

(पीठासीन अधिकारी : विजय. भि. शितोळे )

न्यायनिर्णय घोषित दिनांक – ५ मे, २०२६

**नियमित फौजदारी खटला क्र. १४७/२०२१**

**निशाणी क्र. ५३**

| **गुन्हा नोंद क्र. ३०३/२०२१** | | |
|---|---|---|
| फिर्यादी / तक्रारदार | | महाराष्ट्र शासन मार्फत<br>अक्कलकुवा पोलीस ठाणे,<br>ता. अक्कलकुवा, जि. नंदुरबार. |
| अभियोगपक्षातर्फे | | सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती व्ही.एस.वळवी |
| आरोपी | १. | साजीद सुभान मक्राणी,<br>वय– ४२ वर्षे, धंदा– मजुरी, |
| | २. | अब्दुल मजिद अब्दुल हमिद मक्राणी,<br>वय– ४८ वर्षे, धंदा– मजुरी, |
| | ३. | अब्दुल लतीफ अब्दुल हमिद मक्राणी,<br>वय– ५२ वर्षे, धंदा– मजुरी, |
| | ४. | अब्दुल रऊफ अब्दुल हमिद मक्राणी,<br>वय– ४३ वर्षे, धंदा– मजुरी, |

| | | |
|---|---|---|
| | | सर्व रा.लहान राजमोही, ता. अक्कलकुवा,जि. नंदुरबार. |
| आरोपींतर्फे विधीज्ञ | | श्री. एस.व्ही.पुराणीक |

## भाग – ब

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये)

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | १५.०४.२०२१ |
| फिर्याद दाखल दिनांक | १८.०४.२०२१ |
| दोषारोप पाठविल्याचा दिनांक | १२.११.२०२१ |
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | ११.१२.२०२३ |
| पुरावा सुरू झाल्याचा दिनांक | ११.०३.२०२६ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | --- |
| न्यायनिर्णय दिनांक | ०५.०५.२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | --- |

## आरोपीची माहिती

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ. प्र. सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (set off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | साजीद सुभान मक्राणी | ०२.०३.२०२२ | २०.०९.२०२१ | भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३७९ सह कलम ३४ प्रमाणे. | आरोपीला दोषमुक्त करण्यात आले. | --- | --- |
| २. | अब्दुल मजिद | | | | आरोपींना | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | अब्दुल हमिद मक्राणी | | | | निर्दोष मुक्त करणेत आले. | | |
| ३. | अब्दुल लतीफ अब्दुल हमिद मक्राणी | | | | | | |
| ४. | अब्दुल रऊफ अब्दुल हमिद मक्राणी | | ०३.०३.२०२२ | | | | |

## भाग – क

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)

**सरकारपक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार**

**अ. अभियोगपक्ष**

| सा. क्र. | साक्षीदाराचे नांव | स्वरूप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | अब्दुल कयुम उसमान गनी अन्सारी | फिर्यादी | ४१/क |
| २. | अब्दुल हाफीज अब्दुल रहमान | पंच | ४४/क |
| ३. | विरसिंग ओल्या पाडवी | साक्षीदार | ४८/क |

**ब. न्यायालयामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)**

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | १ | दोषारोपपत्र |
| २. | ४२ | फिर्याद |
| ३. | ४३ | प्रथम खबर अहवाल |
| ४. | ४५ | घटनास्थळाचा पंचनामा |

# न्यायनिर्णय

## ( पारित दिनांक ०५ मे, २०२६ )

प्रस्तुत खटल्यात आरोपी हे भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३७९ सह कलम ३४ अन्वयेच्या आरोपाकरीता सामोरे जात आहेत.

**सरकार पक्षाच्या खटल्याचा थोडक्यात सारांश असा की,**

२. दि. १८.०४.२०२१ रोजी अब्दुल कयुम उसमान गनी अन्सारी (यापुढे फिर्यादी असे संबोधण्यात आले आहे.) यांनी अक्कलकुवा पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली की, दिनांक १५.०८.२०२१ रोजी त्यांचा रखवालदार धीरसिंग पाडवी यांनी रात्री ०८.०० वाजता फोन करुन सांगितले की, त्यांचे लहान राजमोही शिवारातील सर्वे क्रमांक ३२/२, ३२/१/क व ३२/१/ब या शेतातील मकाई पिकाचा हिरवा चारा दुपारी २ ते ३ वाजेच्या दरम्यान साजीद सुभान मक्राणी, अब्दुल मजीद अब्दुल हमीद मक्राणी, अब्दुल रऊफ अब्दुल हमीद मक्राणी व अब्दुल लतीफ अब्दुल हमीद मक्राणी यांनी उपटुन चोरुन नेला. दिनांक १६.०४.२०२१ रोजी सकाळी ०८.०० वाजता फिर्यादीने शेतात जाऊन शेतातील मकाई पिकाचा चारा पहिला असता तो हिरवा चारा उपटुन चोरी झालेला दिसला. मकाई पिकाचा चारा किंमत रुपये ७०००/– चोरी झाल्यामुळे फिर्यादीने वरील आशयाची फिर्यादी अक्कलकुवा पोलिस ठाण्यात दाखल केली.

३. फिर्यादीने दिलेल्या फिर्यादीवरून अक्कलकुवा पोलीस ठाण्यात गु. र. क्र. ३०३/२०२१ अन्वये भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३७९ सह कलम ३४ अन्वये गुन्हयाची नोंद झाली. सदर गुन्हयाचा तपास अ.स.ई श्री. मनोहर गजमल कोळी यांच्याकडे सोपवण्यात आला. तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा केला व

साक्षीदारांचे जाबजबाब नोंदविले तसेच इतर आवश्यक दस्तऐवज हस्तगत केले. तपासाअंती आरोपींविरुध्द त्यांनी अंतिम अहवाल न्यायालयात सादर केला.

४. माझे विद्वान पुर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपींविरुद्ध भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३७९ सह कलम ३४ अन्वये दोषारोप नि. ३५ वर नोंदवून त्यांना त्यांचे मातृभाषेत वाचून व समजावून सांगण्यात आले. आरोपींनी गुन्हा कबूल नसल्याचे कथन करुन सदर खटल्याचा न्यायचौकशीचा पर्याय स्वीकारला.

५. आरोपी क्र. १ ते ४ यांचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे निवेदन नि. ४९ ते ५२ वर नोंदविण्यात आले.

६. अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकील श्रीमती व्ही.एस.वळवी व आरोपींतर्फे वकील श्री. एस.व्हि. पुराणीक यांचा युक्तीवाद ऐकला.

७. खालील मुद्दे माझे अवलोकनात असून त्यांचे निष्कर्ष मी खालील नमुद कारणमिमांसेच्या आधारे नोंदवित आहे.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | दि. १५.०४.२०२१ रोजी मौजे लहान राजमोही, ता. अक्कलकुवा येथील फियार्दीचे शेत शिवारातील सर्वे क्र ३२/२, ३२/१/क व ३२/१/ब मधील मकाई पिकाचा हिरवा चारा आरोपींनी संगनमताने फिर्यादीच्या संमतीशिवास अप्रामाणिकपणे घेऊन जाण्याचा उद्देशाने चोरी केला व त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड विधान कलम ३७९ सह कलम ३४ प्रमाणे शिक्षापात्र असलेला गुन्हा केल्याचे अभियोगपक्षाने शाबीत केले काय? | नाही. |

| | | |
|---|---|---|
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ बाबत –**

८. साक्षीदार क्र. १ अब्दुल कयुम उसमान गनी अन्सारी हे या प्रकरणातील फिर्यादी असुन त्यांनी त्यांच्या पुराव्यात सांगितले की, दिनांक १५.०४.२०२१ रोजी रात्री ०८.०० वाजता विरसिंग ओल्या पाडवी याने त्यांना फोन करुन सांगितले की, शेतातील मकाई पिकाचा चारा साजीद सुभान मक्राणी, अब्दुल मजीद अब्दुल हमीद मक्राणी, अब्दुल रऊफ अब्दुल हमीद मक्राणी व अब्दुल लतीफ अब्दुल हमीद मक्राणी यांनी चोरुन नेला. फिर्यादीने शेतात जाऊन पाहिले असता, शेतातील मकाई चारा चोरीला गेलेला दिसला, त्यामुळे त्याने फिर्याद (नि.क्र. ४२) व प्रथम खबर अहवाल (नि.क्र. ४३) दाखल केला. फियार्दीने त्याचे उलटतपासात मान्य केले की, आरोपी व त्याच्यामध्ये नियमित दिवाणी दावा क्र. २४/२०२० व २०/२०२० असे दोन दावे प्रलंबित आहेत. त्याने हे देखील मान्य केले की, गट क्र. ३२/२, ३२/१/क, ३२/१/ब अशा त्या दाव्यातील मिळकती आहेत. पुढे त्यांनी इतर सर्व सुचक प्रश्नांना नकारार्थी उत्तरे दिली.

९. साक्षीदार क्र. २ अब्दुल हाफीज अब्दुल रहमान हा या प्रकरणातील घटनास्थळ पंचनाम्यावरील पंच असुन त्याने त्याच्या पुराव्यात सांगितले की, दिनांक १८.०४.२०२१ रोजी पोलिसांनी त्याला फिर्यादीच्या शेतात पंचनामा करण्याकरिता बोलाविले होते. पोलिसांनी त्याच्यासमक्ष घटनास्थळाचा पंचनामा (नि.क्र. ४५) केला. घटनास्थळावरुन मक्याचा चारा चोरीला गेला होता. त्याने त्याचे उलटतपासात मान्य

केले की, आरोपी व फिर्यादी यांच्यामध्ये शेतमिळकतीला घेऊन दिवाणी न्यायालयात वाद चालु आहे. पुढे त्याने इतर सर्व सुचक प्रश्नांना नकारार्थी उत्तरे दिली.

१०. साक्षीदार क्र. ३ विरसिंग ओल्या पाडवी याने त्याच्या पुराव्यात सांगितले की, दिनांक १५.०४.२०२१ व १६.०४.२०२१ रोजी तो लग्नात होता. तो फिर्यादीकडे काम करीत होता. घटना काय घडली होती त्याला माहित नाही. सदर साक्षीदाराने अभियोगपक्षास सहाय्य न केल्याने उलटतपासात विचारता येणारे प्रश्न विचारले असता, अभियोगपक्षास सहाय्य होईल असे कोणतेही कथन सदर साक्षीदाराने केलेले नाही.

११. फिर्यादीच्या कथनाप्रमाणे त्याचे शेतात चोरी झाल्याची बाब त्याला विरसिंग ओल्या पाडवी याने सांगितली आहे. यावरुन असे दिसुन येते की, फिर्यादीला ऐकीव स्वरुपाची माहिती आहे. साक्षीदार क्र. ३ विरसिंग पाडवी याने चोरीबाबत काहीही सांगितलेले नाही. त्यामुळे फिर्यादी व साक्षीदार क्र . ३ विरसिंग पाडवी हे ऐकमेकास सहाय्य करीत नसुन ते एकमेकांच्या परस्पर विरोधी कथने करीत आहेत. फिर्यादीचे पुराव्यास पुष्टी मिळत नाही.

१२. चोरीचा गुनहा सिद्ध करण्याकरिता चोरीस गेलेली वस्तु आरोपीच्या ताब्यात असणे आवश्यक आहे किंवा त्याच्या ताब्यातुन जप्त करणे आवश्यक आहे. परंतु अभियोगपक्षामार्फत आलेल्या पुराव्यातुन आरोपीच्या ताब्यातुन मकाई पिकाचा चारा मिळन आला ही बाब कोणत्याही साक्षीदाराने सांगितलेली नाही. वादातील घटना ही दिनांक १५.०४.२०२१ रोजी घडलेली आहे. प्रस्तुत प्रकरणातील फिर्याद ही दिनांक १८.०४.२०२१ रोजी दाखल झालेली आहे. फिर्यादीच्या कथनाप्रमाणे वादातील घटनेबाबत त्याला माहिती दिनांक १५.०४.२०२१ रोजी मिळाली होती. दिनांक १६.०४.२०२१ रोजी फिर्यादी शेतात गेला होता व त्याने शेताची पाहणी केली होती.

अशा परिस्थीतीत फिर्यादीने फिर्याद देण्यास विलंब का झाला याबाबत स्पष्टीकरण देणे आवश्यक होते. परंतु फिर्याद (नि.क्र. ४२) व फिर्यादीचे पुराव्याचे अवलोकन केले असता, फिर्यादीने कोणतेही स्पष्टीकरण दिलेले नाही. फिर्यादी व आरोपी यांच्यात शेतीच्या कारणावरुन न्यायालयात दावे चालु असल्याचे फिर्यादीने मान्य केलेले आहे. त्यामुळे असे दिसुन येते की, फिर्यादीने प्रस्तुत प्रकरणातील फिर्याद ही विचाराअंती दाखल केलेली आहे. अभियोगपक्षामार्फत तपासलेल्या साक्षीदारांच्या पुराव्यावरुन आरोपीच्या ताब्यातुन चोरीस गेलेला मकाई पिकाचा चारा मिळुन आल्याचे सिद्ध होत नाही. त्यामुळे आरोपींनी दिनांक १५.०४.२०२१ रोजी मौजे लहान राजमोही, ता. अक्कलकुवा येथील फियार्दीचे शेत शिवारातील सर्वे क्र ३२/२, ३२/१/क व ३२/१/ब मधील मकाई पिकाचा हिरवा चारा आरोपींनी संगनमताने फिर्यादीच्या संमतीशिवास अप्रामाणिकपणे घेऊन जाण्याचा उद्देशाने चोरी केला ही बाब निःसंशयपणे सिध्द होत नाही. त्यामुळे मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. २ बाबत –</u>**

१३. मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदविल्याने आरोपी क्र. १ ते ४ हे भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३७९ सह कलम ३४ मधून निर्दोषमुक्त होण्यास पात्र आहेत. सबब, मी मुद्दा क्र. २ करीता खालील आदेश पारित करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. आरोपी क्र. १ साजीद सुभान मक्राणी, आरोपी क्र. २ अब्दुल मजीद अब्दुल हमीद मक्राणी, आरोपी क्र.३ अब्दुल लतीफ अब्दुल हमीद मक्राणी व आरोपी क्र. ४ अब्दुल रऊफ अब्दुल हमीद मक्राणी यांना फौजदारी प्रकिया संहिता कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३७९ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केल्याच्या आरोपातून निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपींचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येते.

३. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता,१९७३ चे कलम ४३७(अ) अनुसार प्रत्येकी रक्कम रुपये १५,०००/- चे बंधपत्र व तितक्याच रकमेचे जामीनपत्र देऊन सरकार पक्षाने सदर प्रकरणात अपील केल्यास त्यात हजर राहण्याची ग्वाही द्यावी.

(न्यायनिर्णय खुले न्यायालयात पारित व घोषित करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by VIJAY BHIMRAO SHITOLE
Date: 2026.05.05 11:42:45 +0530

ठिकाण–अक्कलकुवा.
दिनांक – ०५/०५/२०२६

( विजय भि. शितोळे )
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग,
अक्कलकुवा, जि. नंदुरबार.

## <u>दा ख ला</u>

दाखला देण्यात येतो की, सदर पी.डी.एफ. फाईलमधील मजकूर हा मुळ न्यायनिर्णयाप्रमाणेच आहे.

| | | |
| --- | --- | --- |
| लघुलेखकाचे नाव | :– | हार्दिक दौलतभाई वाघ |
| न्यायालयाचे नाव | :– | दिवाणी व फौजदारी न्यायालय, अक्कलकुवा, ता. अक्कलकुवा, जि. नंदूरबार. |
| न्यायनिर्णय जाहीर केल्याची तारीख | :– | ०५/०५/२०२६ |
| न्यायाधिशांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | :– | ०५/०५/२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | :– | ०५/०५/२०२६ |